दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.७ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १०५ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sun 7 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 105 • Pages 4 • Rate 4 Rs

# इंडिगोच्या गोंधळावर सुप्रिया सुळे संतप्त
# प्रवाशांचा वेळ, पैसा वाया, जबाबदार कोण ?

## एकाच कंपनीवर अवलंबून राहू नका; सरकारला इशारा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–देशातील सर्वात मोठी विमानसेवा म्हणून ओळख असलेल्या इंडिगोच्या विस्कळीत सेवेमुळे गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. पुणेसह देशातील अनेक विमानतळांवर उड्डाणे रद्द, अवधीपेक्षा अधिक विलंब आणि प्रवाशांच्या तक्रारींचा भडिमार वाढला आहे. याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. केंद्र सरकारने इंडिगोवर कठोर कारवाई करावी आणि हा प्रकार कसा घडला, याची चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, ही अपेक्षा कुणालाही नव्हती. यामागे जबाबदार कोण? याला उत्तर मिळालेच पाहिजे.पुणे विमानतळावरच मागील दोन दिवसांत इंडिगोची अनेक उड्डाणे रद्द झाली, तर काही उड्डाणांना दीर्घ विलंब झाला. त्याचप्रमाणे बंगळुरू, हैदराबाद, कोलकत्ता या प्रमुख विमानतळांवरही हाच गोंधळ पाहायला मिळाला. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना काही खासदारांनाही या अव्यवस्थेचा त्रास सहन करावा लागला. सुळे म्हणाल्या की, आम्ही प्रवासीही सामान्य नागरिकांसारखेच अडकलो. अनेकांच्या घरात दु:खद घटना घडल्या होत्या, काहींसमोर विवाहाचे कार्यक्रम होते, विद्यार्थी महत्वाच्या परीक्षा किंवा मुलाखतींसाठी निघाले होते. सगळ्यांचे नियोजन आणि मेहनत कोलमडून पडली आहे.

इंडिगोकडून स्पष्टीकरण देताना सांगण्यात आले की, विमानतळाची व्यवस्था, कामकाजातील अडथळे आणि अंतर्गत नियोजनातील त्रुटी यामुळे हा गोंधळ झाला. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात उड्डाणे कोसळल्याने प्रश्न अधिक गंभीर बनले आहेत. एकाच विमान कंपनीकडे एवढा ताबा कसा? प्रवाशांचे जीवन आणि वेळ एका कंपनीच्या हातावर कसा सोपवायचा? असा थेट सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. त्या पुढे म्हणाल्या की, सरकारने अनेक विमान कंपन्यांना चालना दिली पाहिजे. एकाच कंपनीवर अवलंबून राहणे योग्य नाही.प्रवाशांची आर्थिक हानीही कमी नाही. तिकिटांचे पैसे, नव्या बुकिंगचा खर्च, थांबा, राहणीमान, परतीचे पर्याय – सर्व गोष्टींत प्रवाशांचे नुकसान झाले. त्यामुळे प्रवाशांना लिखित स्वरूपात क्षमा मागणे आणि सर्वांची नुकसानभरपाई करणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी नोंदवले आहे. स्वतः इंडिगोनं प्रवाशांची गैरसोय मान्य केली असून तिकिटांचे पैसे परत करण्यात येतील, असं कळवलं आहे. तथापि, प्रवाशांनी सहन केलेला त्रास आणि मानसिक धक्का कोण भरून काढणार? हा प्रश्न कायम आहे.

यावर संसदेतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, सुळे यांनी सरकारकडून स्पष्ट उत्तर मागितले आहे. हा विस्कळीतपणा घडलाच कसा? यात गोंधळच नाही तर बेफिकिरीही दिसते. ही चौकशी निष्पक्ष, तातडीची आणि कठोर असली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. देशात प्रवाशांना सुरक्षित, वेळेवर आणि विश्वासू सेवा देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी बजावले. आता केंद्र सरकार कोणती भूमिका घेणार आणि इंडिगोने यापुढे कोणते पाऊल उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन



दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

संविधान निर्माते तथा दीन दलितांचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमीत्त केज येथे लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूल येथे अभिवादन करण्यात आले. भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त रमाकांत मुंडे यांनी स्थापन केलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूल केज येथे त्यांना अभिवादन करण्यात आला. संस्थेच्या सचिव उषाताई मुंडे, सहसचिव मधुर भैय्या मुंडे, प्राचार्य रवि पवार सर यांच्यासह लखेरा सर, पल्लवी गालफाडे मॅडम, पूजा तरडे मॅडम, नम्रता गायके, सोनवणेताई यांच्यासह शिक्षक कर्मचारी यांच्यासह रितेश बचुटे, विशाल पाटोळे, बुद्धभूषण गायकवाड, हनुमंत मोराळे, शिवम मुंडे, तेजस पवार, महावीर नागरगोजे, गणेश गदळे, आकाश मुंडे, संजय दराडे, विद्यार्थिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थीनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थीत होते.

## साळेगाव येथे महापरिनिर्वाण दिना निमित्त महामानवाला अभिवादन



दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दीन दलितांचे मुक्तिदाते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त साळेगाव तालुका केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच कैलास जाधव पाटील उपसरपंच गणेश गालफाडे, रेखा सरवदे, संभाजी सरवदे, लिंबाजी बचुटे, ज्योतिराम बचुटे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर, रोशन सरवदे, अविनाश सरवदे, अजय बचुटे, उद्धव गित्ते, जालिंदर सरवदे, लक्ष्मण ओव्हाळ, विष्णू बचुटे, भारत बचुटे, रत्नाकर राऊत, राजेश तिडके, कैलास सरवदे, महादेव सरवदे, जय जोगदंड, वाल्मीक सरवदे, अमित बचुटे, रवी गायकवाड, विशाल बचुटे, आश्रूबा सरवदे, भागवत सरवदे यांच्यासह महिला व नागरिक उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दीपक देशमुख यांनी केले अभिवादन!



दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते दीपक (नाना) रंगनाथ देशमुख यांनी अभिवादन केले. शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करण्यात आले. श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, याप्रसंगी दीपक देशमुख यांच्या समवेत नितीन चव्हाण, अमर रोडे, महादेव गंगणे, अरविंद देशमुख, प्रकाश देशमुख मस्के बंधू यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाळासाहेब केदार यांचा वाढदिवस ठरला विद्यार्थ्यांसाठी सोनेरी!

## गप्पेवाडी–नामेवाडीमध्ये शैक्षणिक साहित्य वाटपाने साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



बाळासाहेब केदार यांच्या वाढदिवसानिमित्त गप्पेवाडी नामेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जोपासत,बाळासाहेब केदार यांच्या वाढदिवसाचा उत्सव हा उपक्रम राबवण्यासाठी एक संधी म्हणून वापरण्यात आली. गावातील सर्व विद्यार्थ्यांना वह्या,पेन,पेन्सिल,नोटपॅड यासह काही विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार अतिरिक्त शैक्षणिक साहित्यही दिले गेले.

कार्यक्रमाला स्थानिक ग्रामस्थ,पालक,शिक्षक आणि काही मान्यवरांची उपस्थिती होती.शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की,विद्यार्थ्यांच्या प्रगती साठी अशा सहकार्याची मोठी गरज आहे.त्यांनी असेही नमूद केले की,या साहित्य वितरणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवीन ऊर्जा मिळेल आणि ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला भरभराट होईल.या उपक्रमाद्वारे बाळासाहेब केदार यांनी ग्रामीण भागातील शिक्षणासाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा स्पष्ट केली.वाढदिवस साजरा करण्याचा हा सामाजिक आणि सकारात्मक मार्ग अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला,असे ग्रामस्थांनी व्यक्त केले.ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांच्या मर्यादेचा विचार करता,अशा साहित्य वितरणामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रक्रियेत अधिक सक्रिय पणे सहभागी होण्यास मदत होते असे अनेक पालकांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद विशेष उल्लेखनीय होता.नवीन साहित्य मिळाल्याने ते खूप उत्साही झाले आणि 'नवीन जोमाने अभ्यास करण्याची' भावना त्यांनी व्यक्त केली.या उपक्रमा मुळे स्थानिक पातळीवर सामाजिक सहभाग, शिक्षणाला प्रोत्साहन आणि विद्यार्थी–केंद्रित कामकाज यांना नव्या दृष्टीकोनातून हातभार लागला,असे पालकांनी मत व्यक्त केले. बाळासाहेब केदार यांच्या वाढदिवसानिमित्त पार पडलेल्या या कार्यक्रमाने फक्त औपचारिकतेपुरतेच नाही तर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष गरजांवर लक्ष केंद्रीत केले आणि त्यामुळे त्याची खरी परिणामकारकता सिद्ध झाली आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्त विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



६ डिसेंबर रोजी भारतीय संविधान निर्माता व सामाजिक न्यायाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवारी विविध ठिकाणी आदरांजली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजातील सर्वस्तरांतील नागरिक,महिला,युवक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या श्रद्धाभावाने उपस्थित राहून बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले.

मोठ्या संख्येने महिला व मुलांनी उपस्थित राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मातोश्री रमाबाई यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले.तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेसमोरही दीपप्रज्वलन करून शांततेचा संदेश देण्यात आला.पांढऱ्या वेशातील महिलांचा सहभाग विशेषत्वाने लक्षवेधी होता.काही ठिकाणी निवासी शाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर बाबासाहेबांना अभिवादन केले.फळ्यावर 'महापरिनिर्वाण दिन' संदेश लिहून सामाजिक परिवर्तनातील डॉ. बाबासाहेबांचे योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.केज तालुक्यातील बऱ्याच गावात महिलांपासून युवकांपर्यंत सर्वांनी एकत्र येत आंबेडकर यांच्या आंदोलनाची परंपरा जपण्याची प्रतिज्ञा केली. गौतमबुद्ध व बाबासाहेब यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून दीक्षाभूमीच्या विचारांची प्रेरणा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला. अनेक ठिकाणी युवकांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करून घरगुती पातळीवर श्रद्धांजली कार्यक्रम घेतला. परिवारातील सर्व सदस्यांनी उपस्थित राहून सामाजिक समानतेसाठी योगदान देण्याचा संकल्प केला.सदरील कार्यक्रमात शिक्षक,पालक आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.मुलांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर आधारित गीते, विचार आणि भाषणे सादर केली.बालकांच्या सहभागामुळे वातावरण प्रेरणादायी बनले.

समाजात समानता,बंधुता व मानवतावादाचा संदेश पसरवणे,संविधान मूल्यांचा प्रसार करणे, नव्या पिढीत सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण करणे हा महापरिनिर्वाण दिनाचा संदेश म्हणावा लागेल.दि.६ डिसेंबरचा दिवस हा फक्त स्मरणाचा नसून,विचार अंगीकारण्याचा दिवस असल्याचा सूर सर्वत्र उमटल्याचे या विविध कार्यक्रमांवरून स्पष्ट झाले.

संपादकीय

# शहरे महाग, जनता गरीब!

आज आर्थिक अडचणींमुळे कुटुंबांना निव्वळ जगण्यासाठीही कर्ज घ्यावे लागत आहे. शहरी गरिबांचे जीवन नेहमीच अनिश्चित राहिले आहे; परंतु आता कनिष्ठ मध्यमवर्ग अडचणीत सापडत आहे. घरभाडे, किराणा सामान, शाळेची फी, वाहतूक आणि वैद्यकीय सेवा उत्पन्न यावरील वाढत्या खर्चामुळे पगारदार व्यक्तींनाही जगण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे राहणीमानावर होणारा खर्च हे भविष्यातील नाही, तर सध्याचे संकट आहे. लाखो लोक दैनंदिन जीवनात सततच्या आर्थिक तणावाचा सामना करत आहेत. भारतीय कुटुंबांना दीर्घकाळापासून सावध बचत करणारे मानले जात होते. ते विक्रमी पातळीवर कर्ज घेत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक स्थिरता अहवालानुसार, भारतातील घरगुती कर्ज २०२४ च्या अखेरीस जीडीपीच्या ४२ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०१५ मध्ये हा आकडा सुमारे २६ टक्के होता. सरासरी दरडोई कर्ज फक्त दोन वर्षांमध्ये २३ टक्क्यांनी वाढले आहे. ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या दुप्पट दराने वाढले आहे. २०२३ मध्ये ३.९ लाख रुपयांवरून मार्च २०२५ मध्ये ४.८ लाख रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. या कर्जामध्ये अंदाजे ५५ टक्के रक्कम क्रेडिट कार्ड देयके, वैयक्तिक कर्जे, वाहन कर्जे आणि सोने कर्जे यांसारख्या अनिवासी किरकोळ कर्जांचा समावेश आहे, तर पारंपरिक गृह कर्जे एकूण घरगुती कर्जाच्या फक्त २९ टक्के आहेत. शिक्षण, गृहनिर्माण किंवा लहान व्यवसायांसाठी घेतलेले कर्ज भविष्यातील संपत्ती निर्माण करतात; परंतु उपभोगासाठी घेतलेले कर्ज उत्पादक नसते. कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा जास्त भाग वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्ड बिल भरण्यासाठी खर्च करत असल्याने अनेकांकडे बचत किंवा गुंतवणूक करण्यायोग्य पैसे शिल्लक राहत नाहीत. किराणा सामान, वीज बिल, शाळेची फी किंवा आरोग्यसेवा यासारख्या दैनंदिन खर्चासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. शहरी राहणीमानाचा खर्च वाढत आहे आणि कर्ज या खर्चांचा सामना करण्याची यंत्रणा बनले आहे. आणखी एक चिंताजनक घटक म्हणजे घरगुती आर्थिक बचतीतील घट. सध्याची जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेत असल्याने पगारदार तसेच तरुणांमध्ये बचतीचे प्रमाण कमी रहात आहे. एका 'आयआयटीयन'ने अलीकडेच 'एक्स'वर पोस्ट केले होते, की भारतात राहणीमानाचा खर्च वाढत आहे. अगदी लहान, टियर-३ शहरांमध्येही हे होत आहे. निम्न आणि मध्यम वर्ग कसे जगतील किंवा पुढील काही वर्षांमध्ये कसा टिकाव धरतील, असा प्रश्न आहे. अशा वेळी फक्त मूलभूत फळे, भाज्या आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंना मागणी असेल. आपल्याकडे मूलभूत गरजेच्या काही बाबी फारच जास्त महाग वाटतात. हे संकट भारतातील एक प्रमुख राजकीय मुद्दा का नाही? सामान्य, कष्टकरी भारतीयांच्या दैनंदिन चिंता कोण समजून घेत आहे? प्रश्न अनेक आहेत, पण समाधानकारक उत्तर मिळत नाही. अलिकडेच न्यूयॉर्क शहरात, जोहरान ममदानी महापौरपदाची निवडणूक जिंकले. सत्तेत असलेले बहुतेक भारतीय राजकारणी टाळतात, तेच त्यांनी केले. त्यांनी या संकटावर प्रकाश टाकला. त्यांची मोहीम न्यूयॉर्कच्या कामगार वर्गाच्या भौतिक वास्तवांभोवती बांधली गेली होती. स्थिर भाडे, सार्वत्रिक बालसंगोपन, मोफत सार्वजनिक बसेस, शहरात चालवल्या जाणाऱ्या किराणा दुकाने आणि श्रीमंतांवर जास्तकर या त्यांच्या मागण्या होत्या. ममदानींची अल्पसंख्य ही ओळख (भारतीय वंशाचा युगांडात जन्मलेला मुस्लिम) त्यांच्या मोहिमेच्या यशात एक महत्त्वाचा घटक होता. यामुळे मुस्लिम, दक्षिण आशियाई आणि स्थलांतरितांसारख्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील मतदार एकत्र आले; परंतु २०२५च्या न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदाच्या निवडणुकीमध्ये ते त्यांच्या विजयाचे एकमेव कारण नव्हते. ते जिंकले. कारण ते त्यांच्या मतदारांच्या आर्थिक दुःखाबद्दल बोलले आणि त्यांच्या योजनांची रूपरेषा स्पष्ट करणारा अजेंडा सादर केला. भारतात झालेली यासंदर्भातील चर्चा ममदानी यांच्या संबंधांवर आणि ओळखीवर केंद्रित आहे, तर राहणीमानाच्या खर्चाची धाडसी आणि स्पष्ट चर्चा त्यांच्या मोहिमेचा गाभा होती. भारताला ममदानींच्या सूत्राची नक्कल करण्याची गरज नाही. आपल्या शहरांची वेगळी ओळख असून स्वतःच्या मर्यादा आणि राजकीय संस्कृतीही आहेत. ममदानी आणि त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांकडून आपल्याला प्रचारातील प्रामाणिकपणा शिकण्याची गरज आहे. त्यांनी कोणतेही टाळाटाळ करणारे डावपेच वापरले नाहीत. त्यांनी अस्पष्ट आश्वासने दिली नाहीत. त्यांनी संकटाला तोंड दिले, संभाषण सुरू केले आणि निर्वाहाच्या संकटाला राजकीय अजेंड्याचा केंद्रबिंदू बनवले. भारताकडे याचाच अभाव दिसतो. आता ममदानीनाही अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागेल. प्रचारापेक्षा शासन करणे अधिक कठीण असते. भारतीय शहरी राजकारण जे करण्यात अयशस्वी ठरले आहे, ते त्यांनी आधीच केले आहे. त्यांनी राहणीमानाचा खर्च हा एक कायदेशीर, तातडीचा आणि मध्यवर्ती मुद्दा बनवला आहे. त्यांनी आर्थिक दुःख ही सार्वजनिक चिंता मानली, ते वैयक्तिक ओझे मानले नाही. याच सुमारास भारतात रिझर्व्ह बँकेने उघड केले आहे, की लहान कर्जदार दैनंदिन खर्च भागवण्यासाठी कर्ज घेत असताना मोठे कर्जदार कर्ज घेऊन मालमत्ता बांधत आहेत. मोठे कर्जदार विशेषतः घरांसाठी कर्ज घेत आहेत. या लोकांचा क्रेडिट स्कोअर ७२० च्या वर आहे, तर लहान कर्जदारांचा स्कोअर ७२० च्या खाली आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या आर्थिक स्थिरता अहवालात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांमध्ये भारतीय घरगुती कर्ज वाढले आहे. हे प्रामुख्याने कर्जदारांच्या संख्येत सतत वाढ झाल्यामुळे आहे. जून २०२४ मध्ये भारतीय घरगुती कर्ज जीडीपीच्या ४२.९ टक्के होते. हे इतर उदयोन्मुख देशांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. अहवालानुसार, भारतात घेतलेल्या वैयक्तिक कर्जाचे मुख्य प्रकार म्हणजे वैयक्तिक कर्जे, क्रेडिट कार्ड, ग्राहकोपयोगी वस्तू, वाहने, शिक्षण, शेती यासाठी घेतलेले आणि गृहकर्ज. उच्च श्रेणीतील कर्जदारांमध्ये दरडोई कर्जात वाढ आणि मालमत्ता निर्मितीसाठी कर्जाचा वापर यामुळे आर्थिक स्थिरता वाढण्याची अपेक्षा आहे, मात्र सामान्यजनांच्या एका कर्जाची परतफेड न झाल्यास सर्व कर्जे एनपीए होऊ शकतात. वैयक्तिक कर्ज किंवा क्रेडिट कार्ड बिल परतफेड करण्यात अयशस्वी झालात तर गृहकर्ज किंवा कार कर्जदेखील अडचणीत येऊ शकते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार लहान कर्जावर थकबाकी दिली, तर बँका तुमच्या सर्व कर्जांना एनपीए मानू शकतात. बहुतेक थकबाकी वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्डसारख्या असुरक्षित कर्जांमध्ये आहे. ज्यांनी या लहान कर्जांसह घरे किंवा कारसाठी मोठी कर्जे घेतली आहेत, त्यांना जास्त धोका आहे.आज चीनचे सार्वजनिक कर्ज १४० टक्के इतके सर्वाधिक आहे. जागतिक स्तरावर, २०२४ च्या अखेरीस सार्वजनिक कर्ज जीडीपीच्या ९३ टक्के होईल. याचा अर्थ ते शंभर ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे जाईल. ३० जून रोजी चीनचे कर्ज ते जीडीपी प्रमाण १४० टक्के होते, तर जपानचे १२० टक्के होते. अनेक कर्जे घेणारे कर्जदार क्रेडिट कार्ड आणि वैयक्तिक कर्ज असलेल्या जवळजवळ अर्ध्या कर्जदारांकडे आधीच दुसरे किरकोळ कर्ज आहे. ही कर्जे बहुतेकदा गृहनिर्माण, वाहने किंवा दोन्हीसाठी असतात. या मोठ्या, सुरक्षित कर्जांपेक्षा लहान वैयक्तिक कर्जांना एनपीएचा धोका असतो. वैयक्तिक कर्जे किंवा क्रेडिट कार्ड शिल्लक व्यतिरिक्त इतर किरकोळ कर्जे असलेल्या कर्जदारांमध्ये डिफॉल्टचा धोका हाताळण्यासाठी उचललेली पावले रिझर्व्ह बँकेने अलीकडेच बँका आणि एनबीएफसींसाठी कोणत्याही संभाव्य जोखमींना तोंड देण्यासाठी असुरक्षित कर्जांसारख्या काही किरकोळ कर्जांवर उच्च जोखीम वजन लादले आहे. ५० हजार रुपयांपेक्षा कमी वैयक्तिक कर्ज असलेल्या ११ टक्के कर्जदारांपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त कर्जदारांनी २०२४-२५ मध्ये तीनपेक्षा जास्त वेळा कर्ज घेतले आहे. यातूनच शहरे वाढली पण लोक कर्जबाजारी तसेच गरीब झाले, असे म्हणता येते.

# हळद जास्त पोटात गेली तर किडनी आणि लिव्हर फेल? सुरक्षित प्रमाण काय?



भारतीय आहार आणि आयुर्वेदिक उपचारात एक महत्वाचा मसाला आणि औषध म्हणून वापरली जात असलेली हळद प्रसिद्ध आहे. आयुर्वेदात हळद ही सर्वाधिक फायद्याची म्हटली जाते. यातील एक कंपाऊंड असते करक्युमिन जे हळदीचा सर्वात मोठी ताकद असते. या सूजविरोधी आणि एंटीऑक्सीडेंट गुणांसाठीही ओळखले जाते. यामुळे कोणतीही जखम झाल्यानंतर हळदीचे दूध पिण्याचा सल्ला दिला जातो.परंतू हळदीचे अधिक प्रमाणात सेवन केले तर लिव्हर आणि किडनीच्या आरोग्यासाठी ते नुकसान कारक असते. जर तुम्ही हळदीचे सेवन करत असाल तर आधी याचे नुकसान आणि प्रमाण जाणून घ्या.

**किडनीवर वाईट परिणाम केव्हा ?**

नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ मेडिसिनच्या रिसर्चनुसार हळदीतील ऑक्सलेट जास्त असल्याने ते लघवीतील ऑक्सलेट वाढवते. त्यामुळे कॅल्शियम ऑक्सलेट किडनी स्टोनची जोखीम वाढते. ही समस्या त्या लोकात आणखी गंभीर होऊ शकते ज्यांना आधीच स्टोनचा प्रॉब्लेम झालेला आहे.

**लिव्हरवर वाईट परिणाम केव्हा ?**

नॅशनल इन्स्टीटच्यूट ऑफ मेडिसिनच्या संशोधनानुसार सामान्य डाएटमध्ये हळद सर्वसामान्यपणे सुरक्षित आणि अनेक वेळा लिव्हरच्या सूजेवर फायदेमंद मानले जाते. परंतू गेल्या काही वर्षांत लोकांनी हळद किंवा कर्क्युमिन सप्लीमेंटचे अधिक प्रमाण घेण्यास सुरु केले आहे. बातमीनुसार अशा लोकात १ ते ४ महिन्यात इंटेन्स ड्रग - इंड्यूस्ड लिव्हर इंज्युरी, लिव्हर फेल आणि कधी-कधी हेपाटो-रेनल सिंड्रोम देखील पाहिला गेला आहे. समस्या तेव्हा वाढते जेव्हा हळदीत पिपरिन ( काळ्या मिरीचा अर्क ) मिसळलेला असेल तर तो शोषण अधिक वाढवतो.

**हळदीचे सुरक्षित प्रमाण आणि सुरक्षितता**

WHO 0-3 mg प्रति किलो शरीराच्या वजनाच्या प्रमाणाने प्रतिदिवस कर्क्युमिनचे प्रमाण मर्यादित करण्याचा सल्ला दिला जातो. जर एखाद्या व्यक्तीचे वजन ६० ते ७० किलो असेल तर त्याने २०० ाग प्रतिदिन हून अधिक कर्क्युमिन घेऊ नये. जर भारतीयांच्या डाएटच्या विचार केला तर सामान्य भारतीयांच्या डाएटमध्ये २-२.५ स हळदीतून केवळ ६०-१०० ाग कर्क्यूमिन मिळते.जेवण बनवताना रोज अर्धा चमचा वा एक चमचा हळद ( सुमारे २-३ स) सर्वसाधारणपणे सुरक्षित आहे. जर किडनी - लिव्हरचा काही गंभीर त्रास असायला नको.

ज्यांना लोकांना आधीपासूनच किडनीचा आजार, किडनी स्टोन, लिव्हर डिसिज ( फॅटी लिव्हर, हेपेटायटीस आदी ) गॉलब्लॅडर स्टोन असेल वा ते रक्त पातळ करणारी, इम्यूनसप्रेसेंट, टॅक्रोलिमस आदी औषधे घेत असतील तर त्यांनी डॉक्टराच्या सल्ला शिवाय निश्चित प्रमाणापेक्षा जास्त हळद घेऊ नये.जर हळद/कर्क्युमिन सप्लीमेंट घेतल्यानंतर काविळ, डार्क लघवी, तीव्र थकवा, पोटात उजव्या बाजूला वरती दुखत असेल, वा अचानक किडनीच्या तक्रार अशी लक्षणे दिसत असतील तर त्यांनी डॉक्टरांना लागलीच भेटावे.

# हिवाळ्यात बाईक चालवताना जर तुम्ही 'ही' खबरदारी घेतली नाही तर पडाल आजारी



हिवाळ्यात थंड तापमानापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी आपण उबदार कपड्यांपासून ते निरोगी आहारापर्यंत अनेक गोष्टीं लक्षात ठेवल्या पाहिजेत. याशिवाय तुमच्या दैनंदिन दिनचर्येत अशा अनेक गोष्टी आहेत ज्यांकडे दुर्लक्ष केल्यास आरोग्याच्या समस्या वाढू शकतात. कारण डिसेंबर महिना सुरू झाल्याने वातावरणात थंडावा वाढलेला आहे. त्यामुळे आपण आपल्या आरोग्याची अधिक काळजी घेत असतो. त्याचबरोबर आपल्यापैकी अनेकजण हे कामावर जाताना बाईक घेऊन जात असतात. तसेच अनेकजण थंडीच्या दिवसात बाईक राईड करायला जात असतात. जर तुम्हाला दररोज बाईक चालवायची असेल तर तुम्ही थंडीत काही सोप्या खबरदारी घेतल्या पाहिजेत, अन्यथा तुमचे आरोग्य बिघडू शकते आणि तुम्ही आजारी पडू शकता. या लेखात आपण हिवाळ्यात बाईक चालवताना तुम्ही कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत हे जाणून घेऊयात.

**धुक्यात बाईक चालवताना अशी काळजी घ्या**

हिवाळ्यात धुक्यात बाईक चालवताना तुम्ही अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. यावेळी जास्त स्पीडमध्ये बाईक चालवणे टाळा, कारण धुक्यामुळे समोरील वाहन तसेच काही अंतरावरील गोष्टी लवकर दिसत नाही, झाल्यामुळे अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. बाईक चालवताना तुमचा वेग कमी केल्याने अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. याव्यतिरिक्त तुमच्या सायकलवर अँटी-फॉग लाईट्स बसवण्याचा विचार करा, ज्यामुळे तुम्हाला धुक्यातही स्पष्टपणे पाहता येईल.

**डोळ्यांकडे दुर्लक्ष करू नका**

बाईक चालवताना डोळ्यांची काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे, कारण बाईक चालवताना थंड वारा थेट तुमच्या डोळ्यांवर लागतो. ज्यामुळे लालसरपणा, कोरडेपणा आणि खाज सुटणे यासारख्या समस्या उद्भवतात. बाईक चालवताना थंड वाऱ्यापासून तुमचे डोळे वाचवण्यासाठी तुम्ही चांगल्या क्वॉलिटीचा चष्मा लावावा. तुम्ही असे हेल्मेट देखील निवडू शकता जे पूर्णपणे बंद असेल आणि फ्रंटला ग्लास लावलेला असेल.

**विंडप्रूफ जॅकेट नक्की घ्या**

हिवाळ्यात दुचाकीस्वारांनी त्यांच्या वॉर्डरोबमध्ये एक किंवा दोन विंडप्रूफ जॅकेट नक्कीच असायलाच हवे. कारण तुम्ही कितीही जाड स्वेटर घातला तरीही बाईक चालवताना थंड हवा लागतेच. तर थंडी वाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी विंडप्रूफ जॅकेट नक्की घालावे. याने कडाक्याच्या थंडीतही थंड हवा लागत नाही, ज्यामुळे सर्दी होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होते. यासाठी पफर जॅकेट हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**दुचाकीस्वाराने असे कपडे घालावेत**

तुम्ही जर हिवाळ्यात बाईक चालवत असाल तर तुम्ही तुमच्या एकूण ड्रेसिंगचा विचार केला पाहिजे. कानात वारा जाऊ नये म्हणून तुमच्या हेल्मेटखाली हलकी टोपी ठेवावी. जड बूट किंवा चांगल्या दर्जाचे स्पोर्ट्स शूज देखील सर्वोत्तम आहेत. हिवाळ्यात दुचाकीस्वारांसाठी विशेष हातमोजे बाजारात उपलब्ध असतात. थंड हवेमुळे सुन्नपणा येऊ नये असे हातमोजे तुम्ही खरेदी करू शकता.

# १ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना नारळ पाणी देणे योग्य की अयोग्य?



नारळ पाणी हे निसर्गाने दिलेले एक अद्भुत वरदान आहे. त्याला नैसर्गिक ऊर्जा पेय असेही म्हटले जाते. हे पाणी फक्त ताजेतवाने करणारे नसून शरीरासाठी अत्यंत पौष्टिक आणि आरोग्यदायी आहे. विशेषतः उन्हाळ्यात किंवा व्यायामानंतर शरीरातील द्रवपदार्थांची कमतरता भरून काढण्यासाठी नारळ पाणी सर्वोत्तम पेय ठरते. नारळ पाण्यामध्ये पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम, आणि फॉस्फरस यांसारखे खनिज घटक असतात, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन राखतात. त्यामुळे थकवा, निर्जलीकरण (डिहायड्रेशन) आणि उष्माघात यांसारख्या समस्या टाळल्या जातात. हे पाणी नैसर्गिकरीत्या गोड असल्याने त्यात साखर, कृत्रिम रंग किंवा प्रिझर्व्हेटिव्ह नसतात, त्यामुळे डायबेटीस असणाऱ्यांनाही मर्यादित प्रमाणात सेवन करता येते. नारळ पाणी त्वचेसाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. नियमित सेवन केल्यास त्वचा तजेलदार आणि मऊ राहते. तसेच हे पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकते, ज्यामुळे यकृत (लिव्हर) आणि मूत्रपिंडाचे कार्य सुधारते. गर्भवती महिलांसाठीही नारळ पाणी उपयुक्त मानले जाते, कारण ते उलट्या, थकवा आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, नारळ पाणी नैसर्गिक अँटिऑक्सिडंट्सचे स्रोत आहे, जे शरीरातील पेशींना नुकसानापासून वाचवतात. त्यातील सिटोकायनिन नावाचे घटक वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावतात आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवतात.

खेळाडूंना व्यायामानंतर शरीरातील ऊर्जा पुनर्संचयित करण्यासाठी नारळ पाणी सर्वोत्तम पर्याय आहे. हे पचन सुधारते, आम्लपित्त कमी करते आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते. अशा प्रकारे नारळ पाणी हे आरोग्य, सौंदर्य आणि ताजेतवानेपणाचे प्रतीक आहे. रोज एक नारळ पाणी पिण्याची सवय लावल्यास शरीर निरोगी, त्वचा सुंदर आणि मन प्रसन्न राहते. त्यामुळे म्हणतात नैसर्गिक औषध हवे असल्यास नारळ पाणीच पुरेसे आहे. १ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे पोट खूप नाजूक असते, म्हणून या वयात त्यांना काय खायला द्यायचे याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यावेळी, त्यांची पचनसंस्था पूर्णपणे विकसित होत नाही, म्हणून थोडीशी चुकीची गोष्ट दिल्यास पोटदुखी, गॅस, उलट्या किंवा अतिसार यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे या वयात विचार न करता कोणतेही पेय किंवा अन्न देणे योग्य नाही. नारळाचे पाणी हलके आणि ताजे असते. हे शरीराला हायड्रेशन देण्यास मदत करते, परंतु ६ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना नारळाचे पाणी देऊ नये. या वयात फक्त आईचे दूध दिले पाहिजे. ६ महिन्यांनंतर, जेव्हा बाळाला हलके आणि मऊ अन्न दिले जाते तेव्हा नारळ पाणी अगदी कमी प्रमाणात दिले जाऊ शकते. १ ते २ चमच्याने प्रारंभ करा आणि हळूहळू वाढवा. नारळाचे पाणी नेहमी ताजे असले पाहिजे . लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी आहे की ६ महिन्यांपूर्वी कोणत्याही प्रकारचे बाह्य द्रव, रस, मध किंवा पाणी दिल्यास बाळाच्या पोटावर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सर्व काही नवीन देण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे चांगले. तज्ज्ञांच्या मते, ६ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या मुलाला नारळ पाणी दिले जाऊ शकते, परंतु काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. नारळाचे पाणी नेहमी ताजे पाहावे. बाजारात उपलब्ध असलेले पॅकेज्ड किंवा फ्लेवर्ड नारळाचे पाणी देऊ नका, कारण त्यात साखर आणि प्रिझर्व्हेटिव्ह्ज मिसळले जातात. मुलाला नेहमी सामान्य तापमानात नारळ पाणी द्यावे, जास्त थंड पाणी देऊ नये.लक्षात ठेवा की मुलाला पोटाशी संबंधित कोणतीही समस्या नाही जसे की गॅस, अतिसार, उलट्या किंवा पोटदुखी. अशी समस्या असल्यास नारळाचे पाणी देऊ नका. नेहमी अगदी कमी रकमेपासून सुरुवात करा आणि दिवसातून एकदाच देण्याचा सल्ला दिला जातो. नारळ पाणी ६ ते १२ महिने वयोगटातील बाळांना केवळ आधार म्हणून दिले जाते, खरे पोषण अजूनही आईच्या दुधातूनच मिळते.या गोष्टीही लक्षात ठेवा १ वर्षापूर्वी मुलांना मीठ, साखर आणि मध देऊ नये. नवीन जेवण सुरू करताना एका वेळी एकच गोष्ट द्या. काही असामान्य लक्षणे आढळल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

# हिवाळ्यात तोंडातून पांढरी वाफ का बाहेर पडते?



हिवाळ्यात तोंडातून पांढरी वाफ बाहेर पडणे यामागे नैसर्गिक आणि वैज्ञानिक कारण आहे. ही वाफ म्हणजे दुसरे काही नसून, आपल्या श्वासातील बाष्प थंड हवेमुळे द्रव स्वरूपात रूपांतरित होते. शरीराचे तापमान : मानवी शरीराचे अंतर्गत तापमान नेहमी सुमारे ३७ अंश सेल्सिअस असते. आपण जो श्वास बाहेर टाकतो, त्याचे तापमान देखील शरीराच्या तापमानाइतके उष्ण असते. मात्र बाहेरील हवा की खूप थंड असते. श्वासात बाष्प : आपल्या फुफ्फुसातून बाहेर पडणाऱ्या श्वासात खूप जास्त प्रमाणात पाण्याचे बाष्प असते. हिवाळ्यात आपल्या तोंडातून बाहेर पडणारे उष्ण आणि दमट बाष्प अचानक थंड हवेच्या संपर्कात येतो. बाष्प-संक्षेपण प्रक्रिया : बाहेरील थंड हवा आपल्या उष्ण श्वासातील बाष्पाला वेगाने थंड करते. उष्ण बाष्प थंड झाल्यावर, त्याचे रूपांतर लगेचच लहान पाण्याच्या कणांमध्ये होते. श्वास वाफेसारखा दिसतो : जेव्हा तोडातून बाहेर पडणाऱ्या बाष्पाचे तापमान एका विशिष्ट बिंदूपेक्षा खाली येते, तेव्हा बाष्प द्रवात रूपांतरित होते. हे लाखो अतिसूक्ष्म पाण्याचे कण हवेत तरंगू लागतात, ज्यामुळे ते आपल्याला वाफेसारखे किंवा धुरासारखे दिसते. उन्हाळ्यात वाफ का दिसत नाही? : उन्हाळ्यामध्ये बाहेरील हवा गरम असते त्यामुळे उष्ण श्वास हवेत मिसळतो. तापमान जवळपास एकसारखे असल्यामुळे श्वास द्रवात रूपांतरित होत नाही, म्हणून वाफ दिसत नाही.

# बिबट्याची भीती, नियतीची रीत! तळोदा तालुक्यात 'ऊस-झोळी'त निजलेले तान्हे बाळ... हृदय पिळवटून टाकणारे जीवनचित्र!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

सध्या सर्वत्र ऊसतोड हंगामाची लगबग सुरू आहे. तळोदा तालुक्यातही मोठ्या प्रमाणात ऊसतोडणी सुरू असून, याच कामासाठी खानदेशसह इतर भागातून ऊसतोड कामगारांचे कुटुंबच्या कुटुंब तळ ठोकून आहेत. तळोदा तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या बोरद परिसरात दाखल झालेल्या या कामगारांचे जीवन पाहिल्यास, कोणच्याही माणसाचे डोळे साहजिकच भरून येतात. पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या परिवारासह ट्रॅक्टरच्या साहाय्याने एका शेतातून दुसऱ्या शेतात भटकंती करणाऱ्या या कुटुंबांची कथा म्हणजे केवळ संघर्ष. जिथे ऊस तोडायचा, तिथेच तात्पुरते तंबू उभारून हे कामगार दिवस काढत आहेत. मात्र, या तंबूपेक्षा अधिक सुरक्षित जागेच्या शोधात त्यांची माता-पित्याची माया काळीज पिळवटून टाकणारी सोय करते. बोरद नजीकच्या एका शेतात ऊसतोड सुरू असताना डोळ्यांना दिसलेले एक दृश्य अत्यंत हृदयस्पर्शी होते. बिबट्याच्या वाढत्या धुमाकूळामुळे आपल्या तान्ह्या बाळाला एकट्या तंबूत सोडणे जीवावर उदार होण्यासारखे असल्याने, एका मातेने ऊसाच्या दांड्यांचा आधार घेत तात्पुरती झोळी तयार केली होती. दोन्ही बाजूला तीन-तीन ऊसाचे खांब लावून, मध्यभागी ऊसाच्या जाडजुड खांबाच्या साहाय्याने एक छोटीशी झोळी बांधण्यात आली होती आणि त्याच झोळीत त्यांचे चिमुकले बाळ शांतपणे निद्रावस्थेत होते. हे दृश्य पाहून साहजिकच कोणाचेही डोळे पाणावतील. एकीकडे त्याचे आई-वडील आणि इतर कामगार ऊसतोडणी करत होते, तर दुसरीकडे ते बाळ शेतातच, निसर्गाच्या साहित्यातून तयार झालेल्या पाळण्यात



झोपले होते. कुठलेही साधन नसताना, आहे त्या शेतीमालाच्या आधारावर आपल्या लेकराची झोपण्याची व्यवस्था करण्याचे हे दृश्य मातृत्वाच्या सर्वोच्च त्यागाचे प्रतीक आहे.

भुकेपोटी भटकंती, पोटासाठी पायपीट...
नियतीच्या या खेळात, हरवले बालकांचे गोड गीत.
ऊस-झोळीतला निवारा, जणू मायेची ढाल...
कष्टकरी आई-बापाचा, हाच जीवनकाळ!

या भीषण परिस्थितीबद्दल बोलताना ऊसतोड कामगार शंकर सोनवणे आणि कैलास सोनवणे यांनी आपली व्यथा मांडली. शंकर सोनवणे सांगतात, आम्ही शेतापासून दूर तंबू टाकले आहेत. पण दिवसा कामावर असताना लहान बालकांना त्या ठिकाणी एकटे ठेवणे योग्य नाही. कारण सर्वत्र बिबट्याचा धुमाकूळ आहे. अशा परिस्थितीत तान्ह्याला सोडणे म्हणजे त्याच्या जीवावर उदार होणं होय. त्यामुळे आम्ही कान्होल्याला आमच्या सोबत या ठिकाणी आणतो. कैलास सोनवणे अत्यंत हताशपणे बोलतात, काय करणार? देवाने आमच्यासाठी भटकंतीच लिहून ठेवलेली आहे, ती तर आम्हाला मान्य करावीच लागेल. शिक्षणापासून वंचित राहून, आपल्या कुटुंबासोबत भटकंती करत, ऊसाच्या फडातच बालपण घालवणारे हे चिमुकले, आणि त्यांच्यासाठी रात्रंदिवस कष्ट उपसणारे त्यांचे आई-वडील, त्यांच्या जीवनातील हा संघर्ष एका मोठ्या सामाजिक प्रश्नाकडे लक्ष वेधतो. या कुटुंबांना सुरक्षित निवारा आणि त्यांच्या मुलांसाठी किमान मोबाईल पाळणाघरे व शिक्षण सुविधा मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन विद्यार्थ्यांनी केले बालसभेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**



केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित,राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळे मध्ये महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. बाबासाहेबांनी दिलेल्या लोकशाहीचा विचार पुढील पिढीमध्ये प्रवाहीत राहावा यासाठी शाळेमध्ये बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व कार्यक्रमाचे नियोजन केले.यावेळी मंचावर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी,बाल सभेची अध्यक्षा कु. अंकिता चौरे,शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्हि.बी,श्रीमती अनिता जाधव,श्रीमती ध्वजा गायकवाड यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले. अभिवादन कार्यक्रमा दरम्यान शाळेतील विद्यार्थिनी कु.प्राची शिंदे, वैष्णवी मिसाळ,अन्विता तपसे,आयुषा गायकवाड, सांची बनसोडे,गुंजन राऊत,प्रीतम चौरे,श्रद्धा लांडगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या व भविष्यामध्ये महामानवांच्या कार्याची प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करण्याचा निर्धार केला यावेळी शाळेतील शिक्षिका श्रीमती ध्वजा गायकवाड,श्रीमती अनिता जाधव व शिक्षक श्री.जयपाल मस्के यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रेरक गोष्टी सांगितल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या सभेच्या नियोजनासाठी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.महापुरुषांच्या विचारांवर आपण नेहमी चालले पाहिजे, महामानवांची पुस्तके वाचा असा यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला. बाल सभेची अध्यक्षा कु.अंकिता चौरे हिने पण बाबासाहेबांना अभिवादन करून मनोगत व्यक्त केले.कु.सानिका अंकुशे, योगिता मुसळे,त्रिशा काळे,राजनंदिनी जाधव, अर्पिता नन्नवरे,संचिता रोडे,आर्या घुले यांचाही बालसभेच्या नियोजनात सहभाग होता.कार्यक्रमाचे संचलन चि.समर्थ देशमुख व कु.प्रितम फुंदे यांनी केले तर आभार चि. सार्थक बचुटे याने मानले. कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक श्री.क्षीरसागर आर.एस,श्री.डीरंगे जी.बी.यांचीही उपस्थिती लाभली.

# धोंडीराम कंदुरके यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा उत्साहात पार; गावाचा अभिमान उंचावणाऱ्या जवानास मान्यवरांचा गौरव



दैनिक वादळ वार्ता

**नायगाव बाजार | हनुमंत चंदनकर**

धानोरा (ता.मा.) या लहानशा गावाने आज अभिमानाने भरून येण्याचा क्षण अनुभवला. भारतीय लष्कराच्या 503 AD मिसाईल रेजिमेंट (MRSAM) मध्ये तब्बल २० वर्षे निष्ठेने देशसेवा बजावून सेवानिवृत्त झालेले धोंडीराम हणमंतराव कंदुरके यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याला शनिवारी गावकऱ्यांचा आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.गावकऱ्यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी परमेश्वर पाटील धानोरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, भाजपाचे नेते व माजी पंचायत सभापती श्रावण पाटील भिलवंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य माणिकराव लोहगावे, देगलूर पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, रामतीर्थचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे युवा उद्योजक प्रकाश पाटील भरकाड बेटकबिलोलीकर तसेच सेवानिवृत्त जवान कंदुरके यांची पत्नी सौ. कल्पना कंदुरके उपस्थित होत्या.मान्यवरांनी आपल्या भाषणातून कंदुरके यांच्या शिस्तीच्या, निष्ठेच्या व कर्तव्यपरायण सेवेमुळे गावाचे नाव भारतीय लष्करात उजळल्याचा अभिमान व्यक्त केला. युवा पिढीने प्रेरणा घ्यावी अशी त्यांची कारकीर्द आहे, अशा शब्दांत सर्वांनी त्यांचा गौरव केला.गावकऱ्यांनी केलेल्या सत्कारावेळी कंदुरके भावूक झाले. कार्यक्रमाला यशवंत कुहाडे, आनंदराव पाटील बावणे, गोविंद पाटील कदम, उत्तम ईरवाड, ज्येष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर, हनमंत चंदनकर, श्याम पाटील चोंडे, गणेश पाटील कंदुरके यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.समस्त धानोरा ग्रामस्थांच्या पुढाकाराने झालेला हा सोहळा देशसेवेचा मान राखणाऱ्या जवानाबद्दल गावात असलेल्या कृतज्ञतेचा साक्षीदार ठरला.

# बोधिसत्व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करून शालेय साहित्य वही पेन दान केले



दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बीडवासीयांनी पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपने,बीड यानी बीडवासियांना गरजू होतकरू विद्यार्थ्यांकरिता शालेय साहित्य (वही पेन किंवा आर्थिक सहाय्य) करण्याचे आवाहन केले होते. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला व महापरिनिर्वाणदिन ते क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले स्मृतिदिनापर्यंत १५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करता येईल एवढे साहित्य व आर्थिक दान मिळाले. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची ज्योत आपल्या लेखणीतून तेवत ठेवणाऱ्या वृत्तरत्न सम्राट चे १०० अंक महामानव सार्वजनिक वाचनालय व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने वाटप करण्यात आले. महामानव अभिवादन ग्रुप बीड यानी सर्व दानदात्यांचे आभार व्यक्त केले व पुढे देखील अभिवादन ग्रुप संचलित ४ मोफत शिकवणी वर्ग तसेच महामानव सार्वजनिक वाचनालयाला भरघोस सहाय्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी अभिवादन ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# तांबवा येथील ज्येष्ठ शाहीर तुकाराम ठोंबरे यांना सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते सांस्कृतिक पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**




केज तालुक्यातील तांबवा येथील रहिवासी असलेले महाराष्ट्रातील लोककला शाहिरी आणि समाज प्रबोधनाच्या क्षेत्रामध्ये गेल्या ४५ वर्ष पासून सातत्याने कार्य करणारे जेष्ठ शाहीर तुकाराम गिनाजी ठोंबरे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२४ सालचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार मुंबई येथील रवींद्रनाथ टागोर नाट्य मंदिर या ठिकाणी हा पुरस्कार देण्यात आला ज्येष्ठ कलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे पद्मिनी ताई तुकाराम ठोंबरे व छबुताई अंधारे हे हा पुरस्कार स्वीकारण्या करिता उपस्थित होते या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ व रोख रक्कम तीन लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार व मुंबईचे पालकमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला असंख्य कलावंताच्या सानिध्यातून बीड जिल्ह्यातील केज आणि या केज तालुक्यातील तांबवा या गावचे रहिवासी असणारे ज्येष्ठ कलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे यांच्या तांबेश्वर कलापथकास हा पुरस्कार देण्यात आला.प्रयोगात्मक कलाक्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदाना साठी त्यांच्या तांबेश्वर शाहीर कलापथक या संस्थेला हा सन्मान प्रदान केला.शाहीर तुकाराम ठोंबरे यांचा जन्म एक जून १९५४ साली तांबवा ता.केज जि. बीड येथे झाला त्यांचे शिक्षण इयत्ता नववी पर्यंत झाले मात्र १९७१ सालचा भीषण दुष्काळामुळे त्यांना शाळा सोडून उदरनिर्वाहसाठी काम करावे लागले.वडील भजनी मंडळात गायन वादन करायचे संगीताचे संस्कार लहानपणा पासूनच त्यांच्या मनावर रुजले या संस्कारातून पुढे शाहिरीची आवड विकसित झाली वयाच्या पंधराव्या वर्षी शिवजयंती निमित्त मौजे लहुरी येथे त्यांनी पहिला पोवाड्याचा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर शिवजयंती, गणेशोत्सव,दुर्गाउत्सव, यात्रा आदी प्रसंगी त्यांचे सातत्याने कार्यक्रम सुरू होऊ लागले.१९७१ साली केज येथे शाहीर सम्राट बापूराव विभूते यांचा कार्यक्रम पाहून त्यांना योग्य मार्गदर्शन लाभले आणि तेथूनच त्यांचा शाहिरीला सुरुवात झाली १९८५-८६ पासून शाहीर तुकाराम ठोंबरे हे भारत सरकारच्या गीत नाटक प्रभागाचे मान्यता प्राप्त कलावंत आहेत.त्यांनी महाराष्ट्रासह मध्य प्रदेश गुजरात गोवा व कर्नाटक येथेही पोवाड्याचे कार्यक्रम सादर केले आहेत.ऐतिहासिक पोवाडा बरोबरच व्यसनमुक्ती,अंधश्रद्धा निर्मूलन,लोकशिक्षण, लेक वाचवा लेक शिकवा, वनीकरण,स्वच्छता अशा सामाजिक विषयावर त्यांनी शेकडो प्रबोधनात्मक कार्यक्रम केले.त्यांनी ३ पोवाडे आणि २५ लोक प्रबोधनात्मक गीतांचे लेखनही केले आहे प्रयोगात्मक कलाक्षेत्रा तील संस्था या प्रभागात २०२४ सालचा महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार त्यांच्या तांबेश्वर शाहिरी कलापत कला जाहीर झाला. मराठवाड्यातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या या ज्येष्ठ शाहिरांच्या कार्याची शासनाने घेतलेली दखल ही संपूर्ण लोककला विश्वा साठी प्रेरणादायी ठरत आहे.त्यांच्यावर सर्व क्षेत्रातुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आपले सेवा सरकार केंद्रातील तालुका व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक यांचे ८ डिसेंबर पासून नागपूर येथे उपोषण व आंदोलन

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव बाजार | हनुमंत चंदनकर**

मागील १५ वर्षापासून आपल्याला सरकार सेवा प्रकल्पाअंतर्गत कार्यरत असलेले सर्व तालुका व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापकांना नियुक्ती अद्यापही नियुक्ती देण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेले कर्मचारी दि. ८ डिसेंबर पासून नागपूर येथे बेमुदत अमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.राज्यातील सर्व तालुका व्यवस्थापकव जिल्हा व्यवस्थापक हे मागील १५ वर्षापासून ग्रामविकास विभागाचा संग्राम व आपले सरकार सेवा केंद्र या दोन्ही प्रकल्पाच्या माध्यमातून काम करीत आहेत. त्यांना या कामाचा दीर्घ काळ अनुभव असून ते उत्तम प्रकारे व्यवस्थापन व तांत्रिक काम सांभाळत आहेत. त्यासोबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार पंचायती राज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेले सर्व कामकाज संगणकीकृत करून एकसूत्रता व पारदर्शकता ठेवणे, केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व योजना ग्रामीण पातळीवर राबविणे, तसेच नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा दाखले जन्म-मृत्यू, विवाह नोंद तसेच ग्रामपंचायत अनुषंगिक १ ते ३३ नमुने, इतर व्यावसायिक सेवा, जास्तीत जास्त प्रकारच्या बँकिंग सेवा इत्यादी सेवा ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर त्यांच्या रहिवासी क्षेत्रातच कालबद्ध स्वरुपात देण्यात येत होत्या.

आपले सरकार प्रकल्पासाठी शासनाने सप्टेंबर २०२४ मध्ये रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड व आई टी आई लिमिटेड च्या माध्यमातून मनुष्यबळ भरण्यासाठी अँकसेंट टेक्नॉलॉजी सर्विसेस या कंपनीची निवड करण्यात आली. परंतु या कंपनीची मुदत सप्टेंबर २०२५ रोजी संपली आहे. शासनाने अद्याप पर्यंत आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्प संचलनासाठी कुठलेही पाउल उचलले नाही किंवा ठोस अशी भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे राज्यातील सर्व पंचायत समित्या व जिल्हा परिषद मध्ये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामध्ये काम करणारे तांत्रिक मनुष्य बळ म्हणजे तालुका व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक यांच्यावर उपासमारीची वेळ ओढावलेली आहे.

तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापकांनी मागील १५ वर्षापासून या प्रकल्पावर काम करीत असल्याने ऐन उमेदीत वयाचे १४ ते १५ वर्ष या प्रकल्पात घालवले. आता त्यांची वयोमर्यादा देखील ३९ वर्षे ते ५० वर्षे इतकी झालेली आहे. प्रत्येक वेळी जुन्या कंपनीची मुदत संपल्यावर तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक यांना नियुक्ती देण्यास टाळाटाळ किंवा चालढकल पणा केला जातो. यापूर्वी देखील ग्रामविकास विभागाकडे याबाबतचा पाठपुरावा आमच्या संघटनेच्या मार्फत वेळोवेळी करण्यात आला आहे परंतु याचे समाधानकारक निर्णय किंवा उत्तर आम्हास अद्याप मिळालेले नाही.

त्यामुळे सर्व तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक असे सर्व एकत्रितपणे या पत्राद्वारे नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर दि.८ डिसेंबर २०२५ रोजी सोमवार सकाळी ११ पासून बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

# टिटवाळा येथे श्री शंकर महाराज मंदिरात श्रीदत्त जयंती उत्सव उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**कल्याण | प्रतिनिधी**

जय जय गुरूदेव दत्त दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा अशा भक्तीमय वातावरणात गुरूवारी दत्त जयंती सोहळा श्रीनिवासन महाजन यांच्या मार्गदर्शनाने श्री शंकर महाराज मंदिर (कृष्ण धाम आश्रम ) रूंदा पुलाजवळ टिटवाळा कल्याण येथे मोठा दिमाखदार साजरा करण्यात आला . २९डिसेंबर २०२५ ते १ डिसेंबर२०२५ सकाळी ८ते १०वा. गुरू चरित्र पारायण श्रीदत्त जयंती निमित्ताने सकाळी श्री सत्यदत्त पूजा श्री शंकर महाराज रुद्राभिषेक १० ते १ वा. सुर मधूर भजनी मंडळ,मुरबाड ,गायक उल्हास पगारे, दुपारी १ ते महा आरती व महाप्रसाद सायंकाळी पाच ते सात श्री दत्त जन्म सोहळा अशा प्रकारे दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल सुरु होती.



या सोहळयास मुंबई,ठाणे, कल्याण, डोंबिवली,बदलापूर येथील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर ग्रामस्थ पंचक्रोशीतील महिला आणि भाविक मोठ्या संखेने उपस्थित होते.या वेळी भाविकांनी श्रवण सुखा बरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला. अखेरीस दत्त नामाचा जय घोष करित सर्व भाविकांच्या मनातील मनोकामना पूर्ण व्हाव्या व सुख शांती व समृद्धी लाभावी असे श्री चरणी साकडे घालण्यात आले. श्री गणेश भोईर,सुनिल पोतदार, दत्तात्रेय राणे, गणेश कोंडे,दामोदर पांचाळ, सौ सुमनताई महाजन, सौ विद्या प्रभू, सौ मिनल राणे या सर्वांनी उत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.सागर महाजन यांनी आभार मानले

# खा.सोनवणेंनी प्रश्न मांडला अन् वक्फ मालमत्ता नोंदणीला मिळाला मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ अंतर्गत 'उम्मीद पोर्टल'वर मालमत्ता नोंदणीसाठी दिलेल्या सहा महिन्यांच्या मुदतीचा कालावधी दि.५रोजी संपला असला, तरीही केंद्र सरकारने मुतवल्ली व वक्फ संस्थांसाठी मोठा दिलासा जाहीर केला आहे. केंद्रीय अल्पसंख्यक कल्याण व संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी पुढील तीन महिने कोणताही दंड किंवा कठोर कारवाई न करण्याचा निर्णय जाहीर करताच वक्फ समुदायात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी मुदतवाढ मिळावी, यासाठी पत्र दिले होते. यानंतर हा निर्णय झाला आहे.याबाबत बोलताना मंत्री रिजिजू म्हणाले, 'मार्च २०२६ पर्यंत उम्मीद पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या कोणत्याही मुतवल्ली किंवा वक्फ संस्थेवर दंड, पेनल्टी किंवा कठोर कारवाई केली जाणार नाही.' सर्वोच्च न्यायालयाने केंद्रस्तरावर मुदतवाढ देण्यास नकार दिल्यानंतर सरकारने ही पर्यायी सवलत देत लोकसंख्येतील तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.यासोबतच प्रत्येक राज्याच्या वक्फ ट्रिब्यूनलला वैयक्तिक अर्जांच्या आधारे अतिरिक्त सहा महिने मुदतवाढ देण्याचा अधिकार असल्याचेही रिजिजू यांनी स्पष्ट केले. बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनावणे यांनी या मुदतवाढीसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. दिल्लीमध्ये मंत्र्याची वारंवार भेट घेऊन मुदतवाढ किंवा दंडमुक्ती देण्याचा आग्रह त्यांनी धरला होता. अखेर त्यांच्या तसेच विविध खासदार, वक्फ बोर्ड सदस्य व सामाजिक संस्थांच्या प्रयत्नांना यश मिळाले.

**सरकारकडून पुढचे तीन महिने दंडमुक्ती**

**उम्मीद पोर्टल हे वक्फ मालमत्तांचे जिओ-टॅगिंग, कागदपत्र पडताळणी व पारदर्शक व्यवस्थापना साठी सरकारने तयार केलेले अधिकृत डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. या निर्णयामुळे लाखो मुतवल्लींच्या अडचणी दूर होणार आहेत. मी केंद्र सरकार व मंत्री किरण रिजिजू यांचे मन:पूर्वक आभार मानतो. या विशेष सवलतीचा लाभ घ्या आणि पुढील तीन महिन्यांत आपल्या मालमत्ता नोंदणी पूर्ण करा. -खा.बजरंग सोनवणे, बीड.**

सोनावणे म्हणाले, 'देशातील लाखो मुतवल्ल्यांसाठी हे मोठे समाधान आहे. केंद्र सरकारने समुदायाच्या भावना लक्षात घेत घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे.


**आतापर्यंत झालेली नोंदणी**

१ देशभरात अंदाजे ९ लाख वक्फ मालमत्तांपैकी १.५१ लाखांहून अधिक मालमत्तांची नोंदणी उम्मीद पोर्टलवर पूर्ण झाली आहे. कर्नाटक, पंजाब, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे.

२ अल्पसंख्यक कल्याण मंत्रालयाचे हे अधिकृत डिजिटल व्यासपीठ असून वक्फ मालमत्तांचे जिओ-टॅगिंग, कागदपत्र पडताळणी आणि पारदर्शक व्यवस्थापन यासाठी ते वापरले जाते.

**कायद्याची पार्श्वभूमी**

वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ याच वर्षी मंजूर झाला. नोंदणीसाठी दिलेली सहा महिन्यांची मुदत ६ जून २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ अशी होती. सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ न दिल्याने समुदायामध्ये अनिश्चितता निर्माण झाली होती. आजच्या घोषणेने ही स्थिती निवळली आहे.



## खडक मांजरी येथे महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा

# त्रिरत्न बौद्ध विहारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन

दैनिक वादळ वार्ता

लोहा । राजकुमार पिल्लोळे

लोहा तालुक्यातील ✻खडक मांजरी✻ येथील ✻त्रिरत्न बौद्ध विहारामध्ये✻ महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील प्रतिष्ठित नागरिक ✻मा. मारोतराव वाघमारे✻ हे होते. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमास ✻ग्रामपंचायत सदस्य आनंदराव एडके, सूत्रसंचालन करणारे ✻✻गावचे पोलिस पाटील तथा पोलिस पाटील संघाचे लोहा तालुकाध्यक्ष गौतम वाघमारे, ✻✻माजी सरपंच श्यामराव वाघमारे, ✻✻शिवा विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे, ✻✻जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस. बी. कलणे सर, सहशिक्षक ✻✻एच. एन. मोरे सर, पवार सर, ✻✻माजी सरपंच चांदोबा एडके✻ यांसह गावातील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान यावर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात ✻पत्रकार विश्वनाथ कांबळे, विकास वाघमारे, निवृत्ती वाघमारे, भिमराव वाघमारे, संदीप एडके, एकनाथ भई कापसे✻, तसेच गावातील इतर नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती.याच पार्श्वभूमीवर ✻जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडक मांजरी✻ येथेही महापरिनिर्वाण दिन मोठ्या आदरभावाने साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक ✻कलणे सर✻ यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच ✻शिवा संघटनेचे विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे✻ यांनीही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे शिस्तबद्ध सूत्रसंचालन ✻चांदोबा एडके✻ यांनी केले तर आभार प्रदर्शन गावचे पोलिस पाटील ✻गौतम वाघमारे✻ यांनी केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाला गावातील नागरिक, मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तुलसी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवार, दि. ०६ रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमास प्राचार्य डी.जी. निकाळजे व आयक्यूएसी समन्वयक डॉ. योगिता लांडगे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य निकाळजे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्पांजली अर्पण करून बाबासाहेबांना अभिवादन केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाची, त्यांच्या संविधान निर्मितीतील व सामाजिक परिवर्तनातील योगदानाची माहिती देण्यात आली. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन शिक्षण, समानता आणि सामाजिक बांधिलकीच्या दिशेने कार्य करण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

## सहकार महर्षी पद्मश्री शामरावजी कदम महाविद्यालय येथे माजी सैनिक ज्ञानेश्वर लबडे यांचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता

लोहा । राजकुमार पिल्लोळे

कै.सहकार महर्षी पद्मश्री शामरावजी कदम कनिष्ठ महाविद्यालय येथे महाविद्यालयांचे माजी विद्यार्थी तथा माजी सैनिक ज्ञानेश्वर गोविंदराव लबडे यांनी २० वर्ष देश सेवा करून निवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य गंगाधर स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. या छोटेखानी सत्कार समारंभ प्रसंगी बोलतांना प्राचार्य गंगाधर स्वामी यांनी गोदाकाठचा छावा ज्ञानेश्वर लबडे यांच्या सारखे देश सेवेचं व समाजसेवेचं भाग्य प्रत्येकाची ईच्छा आसूनही लाभत नाही.हे भाग्य आमच्या कमविचे विद्यार्थी ज्ञानेश्वर गोविंदराव लबडे याना लाभले.ते नुकतेच भारतीय सैन्यादलात २० वर्षे सेवा करून निवृत्त झाले.पेनूर मधील भारत मातेच्या संरक्षणाचं भाग्यलाभलेले ते पहिलेच.सैन्यदलात सेवा करण्याठी जे धाडस, धैर्य व देशभक्ती लागते त्याही पेक्षा जास्त धैर्य, देशभक्ती ही आई-वडिलात आसावी लागते.ते धैर्य त्याच्या आई-वडीलानी दाखवले ...त्या मुळेच त्याना सैन्यात जाता आलं व दशसेवेचं कर्तव्य बजावता आलं..

संत तुकाराम महाराज म्हणतात त्या प्रमाणे- पुत्र व्हावा ऐसा गुंडा,ज्याचा तिन्ही लोकी झेंडाआर्थात आसा कर्तबगार, पराक्रमी पुत्र जन्माला यावा की ज्याच्या पराक्रमाचा झेंडा तिन्ही लोकी लागावा.त्या प्रमाणे या पेनूरच्या भुमिपुत्राने गोदा-काठच्या शिवबाने भारताच्या तिन्ही सिमेवर भारतमातेचा झेंडा स्वाभिमानाने फडकावला . आपल्या पराक्रमाने आपल्यातला शिवबा अद्याप जिवंत आहे हे आपल्या शत्रुला दाखवून दिले. धन्य ..त्या माऊलीचे जीने आल्या पोटचा गोळा देशसेवेसाठी पाठविले.त्या आईला व ज्ञानेश्वरच्या देशसेवेला सलाम देशसेवे सारखीच आता समाजसेवा करा. निवृत जिवन, निरोगी ,निरामय,दिर्घ आयुष्य लाभो.हीच प्रार्थणा व शुभेच्छा यावेळी महाविद्यालयांचे प्रा.शंकर गंगापूरे, प्रा.शामराव कोरके, प्रा.मुक्तेश्वर घोटे, भारत पाटील, प्रभूराज पुणेबाईनवाड जेष्ठ नागरिक गोविंदराव लबडे महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.



# दिशा वेल्फेअर ग्रुपच्यावतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा

मुंबई । प्रतिनिधी

विक्रोळी कन्नमवार नगर येथील दिशा वेल्फेअर ग्रुप या सामाजिक संस्थेच्या वतीने ३ डिसेंबर २०२५ हा जागतिक दिव्यांग दिन संत गजानन महाराज चौकात साजरा करण्यात आला. याप्रसंगी दिव्यांग व्यक्तींना तीन चाकी सायकल, व्हील चेअर तसेच रुग्णोपयोगी वस्तूचे वाटप इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएस चे अध्यक्ष डॉ. हरिश पांचाळ, दिशा वेल्फेअर ग्रुपचे संस्थापक संचालक भास्कर बेरीशेट्टी व रुग्णमित्र विनोद साडविलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शांतीवनच्या सर्वेसर्वा निलिमा दिदि,समाजसेविका जयश्री दिदी, माजी नगरसेवक उपेंद्र सावंत, प्रभात मित्र मंडळाचे सचिव, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, विक्रोळी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष राहूल वाघधरे, विक्रोळी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा प्रज्ञा कदम, भाजपा विक्रोळी पूर्व मंडळ प्रमुख केतकी सांगळे, सक्षम महिला मंडळाच्या अध्यक्षा पुजा दळवी, दिशा ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर आदि मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी संवेदना सोशल फाऊंडेशनच्या मुक कर्णबधिर मतिमंद विद्यार्थ्यांना नित्योपयोगी वस्तू आणि संवेदना संस्थेला, ऑक्युपेशनल थेरपी संच आणि संबंधित ११ वस्तूंचे वाटप संस्थेच्या अध्यक्षा प्रिती शिरिशकर यांच्या स्वाधिन माजी नगरसेवक उपेंद्र सावंत व निलिमा दिदी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मतिमंत विद्यार्थ्यांचा उत्साह ओसांडून वाहत होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश पालव भगवान कुर्ले, सहिष्णूता कांबळे, निशा जाधव, सुरेश पांचाळ यांनी बरीच मेहनत घेतली होती.



# चौसाळा येथे महापरिनिर्वाण दिना निमित्त विविध ठिकाणी अभिवादन

**चौसाळा शहराचे सरपंच यांना महापरिनिर्वाण दिनाचा विसर**

दैनिक वादळ वार्ता

चौसाळा । प्रतिनिधी

६ डिसेंबर हा दिवस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन म्हणुन संपुर्ण देशभरात साजरा करण्यात येतो या निमित्ताने बीड तालुक्यातील चौसाळा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विविध ठिकाणी अभिवादन करून महापरिनिर्वाण दिन साजरा केला. या निमित्ताने चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच अंकुश कळासे यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे,विलास वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, ग्रामपंचायत सदस्य कोंडिराम जोगदंड, पत्रकार विकास सर्वज्ञ, दादाराव ढोकणे, लखन जोगदंड,इसाक सय्यद, ग्रामपंचायत लिपिक पवार साहेब उपस्थित होते यानंतर चौसाळा शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नामफलकाला उपसरपंच अंकुश कळासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच चौसाळा शहरातील भीम नगर येथिल बुध्दविहारात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण आकृती पुतळ्यास चौसाळा ग्रामपंचायतचे सदस्य किशोर ढोकणे व चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी बापु चव्हाण,प्रभू मस्के,बबन पवार,तानाजी इंगळे,विनोद घोडके,रोहीत जावळे,साहील चव्हाण,विपुल चव्हाण,विकी सिरसाळे, लखन जोगदंड,दादाराव ढोकणे, पंकज रूपवते, सागर पवार,जितरत्न विवेक कुचेकर यांच्या सह महीला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या यावेळी बुध्द वंदना घेऊन अभिवादन सभेचा समारोप करण्यात आला.चौसाळा ग्रामपंचायत कोणत्यान कोणत्या कारणाने नेहमीच चर्चेत असुन येथिल सरपंच हे महापरिनिर्वाण दिनी गैरहजर राहल्यामुळे येथिल आंबेडकरी जनेतेतुन नाराजी व्यक्त करण्यात येत असुन प्रत्येक महापुरुषांच्या जयंती दिनाला सरपंच हे गैरहजर राहत असल्याने बहुजन समाजातुन संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077